सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**
**(Formerly Pune University)**
**Ganeshkhind, Pune – 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. CA/919 दिनांक : 04/06/2024

मा.प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय :- बी.कॉम (बीएम), बी.कॉम. (आयबी), बी.कॉम. (सीए). व बी.एस्सी. (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) या अभ्यासक्रमांची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत.

संदर्भ :- परिपत्रक क्र.१०६ व १०८/२०२४ जा.क्र.सीबीसीएम/३८८, दि.२४/०५/२०२४.

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत इयत्ता बारावी नंतरच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना माहितीसाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात यावी:

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेमध्ये चालविण्यात येत असलेल्या खालीलप्रमाणे नमूद केलेल्या पदवी अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता देण्याचे त्यांच्या मान्यता पुस्तकांमध्ये जाहीर केलेले आहे. त्यानुसार, ज्या अभ्यासक्रमांना सध्या विद्यापीठाची संलग्नता प्राप्त असून त्यांनी सध्या चालवीत असलेल्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेण्यासाठी अर्ज करून मान्यता घेतली आहे अशा सर्व संस्थांनी त्यांचे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार चालविणे बंधनकारक असून त्याची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत निर्देशित प्रक्रियेनुसार होणार आहे याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पूर्वीचे नाव | नवीन नाव (शै.वर्ष २०२४-२५ पासून) |
|---|---|---|
| 1. | Bachelor of Business Administration (BBA) | Bachelor of Commerce in Business Management B. Com. (BM) |
| 2. | Bachelor of Business Administration in International Business BBA(IB) | Bachelor of Commerce in International Business B.Com. (IB) |
| 3. | Bachelor of Business Administration in Computer Application BBA(CA) | Bachelor of Commerce in Computer Application B.Com.(CA) |
| 4. | Bachelor of Computer Application (BCA) | B.Sc. (Computer Application) |

ज्या संस्थांनी त्यांच्या सध्या चालवीत असलेल्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यते करता अर्ज केलेला नसून त्यांची कुठलीही मान्यता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे प्रलंबित नाही अशा सर्व संस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपरोक्त परिपत्रकांनुसार बदललेल्या नामाभिदानाप्रमाणे आपले अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून चालविणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे दोन्ही अभ्यासक्रमांचा आराखडा आणि प्रथम वर्षाचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार केलेला अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध होणार आहे. सर्व संबंधित महाविद्यालयांनी आपापल्या संकेतस्थळावर, विद्यापीठाच्या लॉगिन वर आणि इतर सर्व माहितीपत्रकामध्ये आपल्या सर्व अभ्यासक्रमांची स्पष्ट माहिती विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य आहे.

अभ्यासक्रमांची मान्यता आणि नामाभिदान शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून कोणत्या प्रकारचे राहील याची स्पष्टता विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशाच्या वेळी असणे गरजेचे आहे याची कृपया नोंद घ्यावी. दोन्ही अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्काची व इतर माहिती आपल्या माहिती पुस्तिकेमध्ये तसेच आवश्यक त्या संकेतस्थळावर आणि संपर्क साधनांमध्ये प्रसिद्ध करताना त्यामध्ये संपूर्ण स्पष्टता असणे गरजेचे आहे.

गिरिश बेंद
उपकुलसचिव, संलग्नता कक्ष